सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १०**

# मुंबई महसूल क्षेत्राधिकार अधिनियम, १८७६

**(दिनांक १६ ऑगस्ट, २००३ पर्यंत सुधारित)**

# Act No. X of 1876
# The Bombay Revenue Jurisdiction Act, 1876

*(As modified upto 16th August 2003)*

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२००६

[किंमत रु. ६/-]

# मुंबई महसूल क्षेत्राधिकार अधिनियम, १८७६

## अनुक्रमणिका


| उद्देशिका<br>कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव ... ... ... | २ |
| | प्रारंभ ... ... ... | २ |
| | व्याप्ती ... ... ... | २ |
| २. | [निरसित] ... ... ... | ३ |
| ३. | अर्थविवरणात्मक कलम ... ... ... | ३ |
| ४. | विवक्षित दाव्यास प्रतिबंध ... ... ... | ३ |
| ५. | विवक्षित दाव्यांचा बचाव ... ... ... | ७ |
| ६. | महसूल अधिकाऱ्याविरुद्ध विवक्षित दावे करण्यास मनाई ... ... | ८ |
| ७. | महसूल अधिकाऱ्याला दिलेल्या शिक्षेमुळे किंवा त्यांच्या विरुद्ध केलेल्या खटल्यामुळे दिवाणी उपाययोजना करण्यात प्रतिबंध न होणे ... ... ... | ८ |
| ८. | [निरसित] ... ... ... | ९ |
| ९. | [निरसित] ... ... ... | ९ |
| १०. | [निरसित] ... ... ... | ९ |
| ११. | अपिल करण्याचा अधिकार वादीने बजावल्याशिवाय दावे दाखल करता कामा नये | ९ |
| १२. | वादग्रस्त मुद्दे निर्णयासाठी उच्च न्यायालयाकडे पाठविण्याचा राज्य सरकारचा अधिकार | ९ |
| १३. | क्षेत्राधिकारासंबंधीचे मुद्दे उच्च न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविण्याचा दिवाणी न्यायाधिशाचा अधिकार ... ... ... | १० |
| १४. | न्यायमंडळातील न्यायाधिशांची संख्या ... ... ... | १० |
| १५. | [निरसित] ... ... ... | १० |
| १६. | सरकारने बचाव केलेल्या दाव्यांबाबत त्यांचे विशेष अधिकार ... ... | १० |
| १७. | [निरसित] ... ... ... | ११ |
| | पहिली अनुसूची [निरसित] ... ... ... | १२ |
| | दुसरी अनुसूची ... ... ... | १२ |

## सन १८७६ चा मुंबई अधिनियम १०[1]

## *[मुंबई महसूल क्षेत्राधिकार अधिनियम, १८७६.]

[२८ मार्च, १८७६]

हा अधियिम पुढील अधिनियमांन्वये अंशतः रद्द करण्यात आला :--

सन १८९४ चा अधिनियम ४;

सन१८९५ चा अधिनियम १६;

सन १८८० चा अधिनियम १५;

सन १८९१ चा अधिनियम १२;

सन १९३८ चा मुंबई अधिनियम १.

या अधिनियमात पुढील अधिनियमांअन्वये सुधारणा करण्यात आल्या :--

सन १८८० चा अधिनियम १५;

सन १८९१ चा अधिनियम १२;

सन १८७७ चा अधिनियम १६;

सन १९२९ चा मुंबई अधिनियम २१;

त्यात भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश या अन्वये रूपभेद व अनुकूलन करण्यात आले.

† सन १९४५ चा मुंबई अधिनियम १७;

सन १९५९ चा मुंबई अधिनियम ४८.

त्यात भारतीय स्वातंत्र्य (केंद्रीय अधिनियम व अध्यादेश अनुकूलन) आदेश, १९४८, या अन्वये अनुकूलन व रूपभेद करण्यात आले.

त्यात विधि अनुकूलन आदेश, १९५०, या अन्वये अनुकूलन व रूपभेद करण्यात आले.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये अनुकूलन व रूपभेद करण्यात आले.

विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६

सन १९५९ चा मुंबई ४८.

सन १९६६ चा महाराष्ट्र ४१.

सन १९६० चा अनुकूलन आदेश

सबंध मुंबई इलाख्यातील दिवाणी न्यायालयांचे जमीन महसूलाबाबतचे क्षेत्राधिकार मर्यादित करण्यासाठी आणि इतर प्रयोजनांसाठी केलेला अधिनियम.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी भारताचे राजपत्र १८७३, भाग-पाच पृ. ५३४ पहावे. निवड समितीच्या प्रारंभिक अहवालासाठी वरीलप्रमाणे, १८७४, भाग-पाच पृ. ७० पहावे. निवड समितीच्या आणखी अहवालासाठी वरीलप्रमाणे १८७५, भाग-पाच पृ. २१० पहावे; आणि परिषदेतील कार्यवाहीसाठी वरीलप्रमाणे १८७५, पुरवणी पृ. ४ व वरीलप्रमाणेच १८७६, पुरवणी पृ. ३४४ व ४०५ पहावे.

* या अधिनियमाचा विस्तार केला आहे आणि अशा विस्तारासह तो संपूर्ण मुंबई राज्यास लागू करण्यात येईल (पहा सन १९५९ चा मुंबई अधि. क्र. ४८, कलम २)

† या अधिनियमाद्वारे केलेली सुधारणा सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५२, कलम २, परंतुकाद्वारे व्यावृत्त करण्यात आली.

**ज्याअर्थी,** मुंबई इलाख्यातील विवक्षित भागात जमीन महसुलाबाबतचे दिवाणी न्यायालयांचे क्षेत्राधिकार हे, उक्त इलाख्यातील उर्वरित भागांतील क्षेत्राधिकारापेक्षा अधिक व्यापक आहेत; उद्देशिका

**आणि ज्याअर्थी,** उक्त इलाख्यातील सर्व दिवाणी न्यायालयांचे क्षेत्राधिकार हे यात यापुढे देण्यात आलेल्या रीतीने मर्यादित करणे इष्ट आहे;

**आणि ज्याअर्थी,** [1]मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, कलम ३२, याची सुधारणा करणे आणि भूमि सुधारणा अधिनियम, १८७१, अन्वये रद्द केलेल्या मुंबई अधिनियम संग्रहातील सन १८२७ चा विनियम १७, [2]कलम १३ च्या विवक्षित तरतुदी पुन्हा अमलात आणणे इष्ट आहे [3] * * * *; १८६९ चा १४. १८७१ चा २६.

**त्याअर्थी,** या अन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव १. या अधिनियमास, मुंबई महसूल क्षेत्राधिकार अधिनियम, १८७६ असे म्हणावे.

प्रारंभ कलम ४ च्या जेवढ्या भागाचा संबंध जमीन महसुलाच्या थकबाकीसाठी मालमत्तेची विक्री, लबाडीच्या कारणांव्यतिरिक्त नियमबाह्यतेमुळे, चुकीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणावरून रद्द करण्यासाठी केलेल्या दाव्याशी येतो तेवढा भाग, भारताच्या राजपत्रातील अधिसूचनेद्वारे गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिल हे या बाबत निदेश देतील [4][त्या दिवशी मुंबई इलाख्यात अंमलात येईल.] या अधिनियमाचा उरलेला भाग [5][तो संमत झाल्यावर अंमलात येईल];

आणि तो,

व्याप्ती. (क) [6][मुंबई शहरात] असलेल्या कोणत्याही जमिनीच्या महसूल आकारणीसंबंधीचा कोणताही दावा किंवा असा महसूल गोळा करण्यासंबंधीच्या गोष्टीस;

---

[1] या अधिनियमाद्वारे केलेली सुधारणा सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५२, कलम २, परंतुकाद्वारे व्यावृत्त करण्यात आली.

[2] या अधिनियमाचे कलम १७, सन १८२७ चा मुंबई नोंदणी १७ द्वारे सुधारण्यात आले होते. ते सन १८८० चा अधि. १५ द्वारे निरसित करण्यात आले. फक्त त्यातील अनुसूचित जिल्हे वगळण्यात आले ते असे :

पुढील मेहवासी चिखली मधील गावे : (१) काठी येथील पारवी; (२) नाल येथील पारवी; (३) सिंगपूर येथील पारवी; (४) गोहाल्वी येथील वाळवी; (५) चिखली येथील वसावा; (६) नवलपूर येथील पारवी यांना मुंबई भूमि महसूल संहिता, १८७९ (१८७९ चा मुंबई ५) यात लागू करण्यात आली नाही. (पहा १८८० चा अधि. क्र. १५ कलम २.)

[3] निरसन व सुधारणा अधिनियम, १८९४ (१८९४ चा ४) द्वारे वरील मजकूर निरसित करण्यात आला.

[4] सन १९५९ चा मुंबई अधि. क्र. ४८, कलम ३ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

[5] १९ सप्टेंबर, १८८१ पहा. अधिसूचना क्र. १९७ दिनांक १८ मार्च, १८८१, भारताचे राजपत्र १८८१, भाग एक पृ. ९२.

[6] बृहन्मुंबईचा विधिबाबत व मुंबई उच्च न्यायालयाच्या (हद्दी जाहीर करण्याबाबत) अधिनियम, १९४५, (१९४५ चा १७) कलम ९ तसेच सन १९४७ चा मुंबई ५२, कलम २ परंतुक याद्वारे मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

देशिका

(ख) सन १८६२ चा मुंबई अधिनियम ५, सन १८६२ चा मुंबई अधिनियम ६ किंवा सन [१][१८८१ चा [२][अधिनियम] २१] किंवा सन [३][१८७१ चा अधिनियम २३] यातील कोणत्याही तरतुदीस बाध न येता, [४][महाराष्ट्र राज्यास] लागू असेल.

[५] * * * * * *

२. (रद्द केलेले अधिनियम.) हे कलम सन १८९१ चा अधिनियम १२ या अन्वये रद्द करण्यात आले.

८६९ चा १४.
८७१ चा २६.

अर्थविवरणात्मक कलम.

३. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात,—

"भूमि" या संज्ञेत, गावे, नगरे आणि शहरे यांची जागा यांचा समावेश होतो : तसेच तीत, झाडे, उभी पिके गवत झाडांवरील फळे आणि प्रवाही रस, वाहिवाटीचा रस्ता, तरीच्या आणि मच्छीमारीच्या जागा, आणि जमिनीतून उत्पन्न होणाऱ्या फायद्याचा व भूमीला जोडलेल्या वस्तूंचा किंवा भूमीत जोडलेल्या वस्तूला कायम बांधलेल्या वस्तू, यांचा समावेश होतो;

"जमीन महसूल" याचा अर्थ कोणत्याही व्यक्तीने धारण केलेल्या किंवा त्याच्याकडे निहित असलेल्या, जमिनीबद्दल [६][सरकारास] किंवा [६][सरकारच्या] वतीने मागणी करण्याजोगी किंवा त्यास मिळालेली रक्कम किंवा पैशाच्या किंवा तत्सम स्वरूपात दिलेली रक्कम, किंवा [७][राज्य सरकारने] त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विधिच्या तरतुदींअन्वये अधिकृत केलेला कोणताही उपकर किंवा दर, असा आहे;

"महसूल-अधिकारी" याचा अर्थ, जमीन महसूल किंवा त्याबाबतची आकारणी, हिशोब किंवा दफ्तरे या कामात किंवा कामाकरिता नेमलेला अधिकारी, असा आहे.

विवक्षित दाव्यास प्रतिबंध.

४. यात यापुढे दिलेल्या अपवादास अधीन राहून, कोणत्याही दिवाणी न्यायालयाने पुढील गोष्टींपैकी कोणत्याही गोष्टी संबंधाने आपला क्षेत्राधिकार चालविता कामा नये.

(क) [८][सन १८७४ चा मुंबई अधिनियम क्र. ३] किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही विधि या अन्वये नेमलेल्या किंवा मान्यता दिलेल्या वंशपरंपरागत अधिकाऱ्याच्या पदाशी संबंध असणाऱ्या कोणत्याही मालमत्तेच्या संबंधात किंवा कोणताही ग्राम अधिकारी किंवा सेवक यांनी [९][सरकार][१०][विरुद्ध केलेले दावे].

अशा अधिकाऱ्याने किंवा सेवकाने कर्तव्ये पार पाडण्यासंबंधीचे किंवा अशा पदावरून किंवा सेवेतून वगळल्यामुळे झालेली कोणतीही नुकसानी याबद्दल केलेले दावे, किंवा

---

[१] भरोच व कैरा भारग्रस्त संपदा अधिनियम, १८८१

[२] निरसन व सुधारणा अधिनियम, १८९१ (१८९१ चा १२) द्वारे मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

[३] निवृत्तिवेतन अधिनियम, १८७१

[४] अनुकूलन आदेश, १९६० द्वारे मूळ मजकुराऐवजी नवीन मजकूर दाखल करण्यात आला.

[५] निरसन व सुधारणा अधिनियम, १८९५ (१८९५ चा १६) द्वारे खंड(ग) निरसित करण्यात आला.

[६] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश, द्वारे मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

[७] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

[८] बॉम्बे हेरिडिटरी ऑफिसर्स ॲक्ट, १८७४.

[९] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

या अधिनियमाअन्वये किंवा त्याच विषयासंबंधीचा त्या त्या वेळी अंमलात असणारा कोणताही विधि [1][या अन्वये [3][राज्य] सरकारने] किंवा याबाबत योग्य रीत्या अधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने दिलेला कोणताही आदेश आणि रद्द करण्यासंबंधीचे कोणतेही दावे; अथवा

[2] * * * * *

(ख) [1][[3][राज्य] सरकारने] अधिकृत ठरविलेली जमीन महसुलाच्या आकारणीची कोणतीही रक्कम किंवा त्यास आनुषंगिक असणाऱ्या गोष्टी, यांवर, अथवा

आकारणी करण्याची पद्धत किंवा अशी आकारणी ज्या तत्त्वावर केली गेली तीं तत्त्वे यांवर, अथवा

भूमापन किंवा भूमि व्यवस्था या बाबतच्या अधिसूचनेची किंवा अशी भूमि व्यवस्था ठरविण्याच्या कोणत्याही अधिसूचनेची वैधता किंवा त्यांचा परिणाम म्हणून घेतलेल्या हरकती;

(ग) जमीन महसूल वसूल करण्याबाबत असलेल्या कोणत्याही कामकाजाशी संबंधित असलेले किंवा कामकाजातून उद्‌भवलेले किंवा वरिष्ठ धारकांना, त्यांना त्यांच्या कनिष्ठ धारकांकडून किंवा कुळाकडून येणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी [1][[3][राज्य] सरकारने] किंवा त्याबाबत योग्यरीत्या अधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने दिलेल्या सहाय्यामुळे उद्‌भवलेले किंवा त्याच्याशी संबंध असलेले दावे; जमीन महसुलाच्या थकबाकीसाठी मालमत्तेची विक्री ही, लबाडीच्या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणामुळे, म्हणजे नियमबाह्यतेमुळे, चुकीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणावरून रद्द करण्यासाठी केलेले दावे;

(घ) (१) महसूल-पाहणी पुस्तक, भूमिव्यवस्था-दफ्तर किंवा गावाचे दफ्तर यात नोंदणी करावयाचे व जमीन महसुलास पात्र असतील असे किंवा वरिष्ठ धारक, कनिष्ठ धारक, खातेदार किंवा कूळ म्हणून;

(२) महसूल-पाहणी पुस्तक किंवा भूमि व्यवस्था दफ्तराच्या अभिलेखात कोणतीही नोंदणी करावयासाठी;

(३) अशी कोणतीही नोंद एकतर वगळण्यासाठी किंवा तींत सुधारणा करण्यासाठी;

[4][[5][सरकार] विरुद्ध केलेले दावे]

(ङ) [6]सन १८६८ चा मुंबई अधिनियम ४ किंवा त्या त्या वेळी अंमलात असणारा कोणताही विधि या अन्वये कोणत्याही भूसंपत्तीची विभागणी केल्यानंतर जमिनीची किंवा जमीन महसूलाची वाटणी करण्याबद्दलचे दावे;

---

[1] विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[2] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४(एक) अन्वये हा परिच्छेद वगळण्यात आला.

[3] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे मूळ मजकूराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

[5] विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[6] जेथे हा अधिनियम नंतर अंमलात आला त्या क्षेत्रामध्ये, मुंबई भूमि महसूल संहिता १८७९,(१८७९ चा मुंबई ५) द्वारे (१८६८ चा मुंबई ४, सन १८६५ चा मुंबई १) कलमे ३७ व ३८ खेरीज) आणि सन १८२७ चा मुंबई नोंदणी १७ निरसित करण्यात आले.

अधिनियम, १८८० (१८८० चा मुंबई १) जेथे लागू आहे किंवा होता अशा रत्नागिरी किंवा कोलाबा जिल्ह्यातील कोणत्याही गावांना सन १८६५ चा मुंबई अधि. क्र. १ याची कलमे ३७ आणि ३८ जशी लागू होती ती निरसित केली आहेत.

(च) जमीन महसुलाची अंशतः किंवा पूर्णतः माफी मिळालेली जमीन धारण करण्यासाठी किंवा जमीन महसुलावर आकारलेली किंवा त्याबद्दल देणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी किंवा त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही विधीच्या तरतुदीं अन्वये [१][[२][राज्य] सरकारने] [३][बसविलेला, आकारणी केलेला, किंवा अधिकृत केलेला कोणताही उपकार, पट्टी, प्रिमियम किंवा दंड] रद्द करण्याबद्दलचे, किंवा [१][[२][सरकारच्या] मालकीच्या] पडीत किंवा रिकाम्या जागेच्या कब्जाबाबत [१][[२][सरकार] विरुद्ध केलेले दावे];

[४][(चक) सरकार किंवा कोणताही महसूल अधिकारी याच्या विरुद्ध जमीन महसूल कमी करण्याबाबत, तहकूब करण्याबाबत किंवा कोणत्याही वर्षी पिके बुडाली आहेत असे घोषणापत्र मिळण्यासाठी दावे ;

(चख) जिल्हाधिकाऱ्याने किंवा मोजणी अधिकाऱ्याने मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९, अन्वये किंवा तत्कालीन अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधि अन्वये कोणत्याही महसूल अधिकाऱ्याने दिलेला गांवठाण किंवा आबादी ठरविण्यासंबंधीचा निर्णय रद्द करणे किंवा त्यात फेरफार करणे याबाबतचा दावा; १८७९ चा मुंबई ५.

(चग) जमीन महसूलसंबंधीच्या कोणत्याही विधि अन्वये किंवा तदनुसार कोणत्याही महसूल अधिकाऱ्यावर लादलेले कोणतेही कर्तव्य बजावण्यास भाग पाडण्यासाठी दावा;

(चघ) मध्यप्रदेश भूराजस्व संहिता, १९५४, कलम १५०, अन्वये भूमिधाऱ्यास भूमिस्वामीचे हक्क मिळाले आहेत असे घोषित करण्यासाठी किंवा घोषित करण्याबाबत दावा; १९५५ चा मध्यप्रदेश च

(चङ) मध्यप्रदेश भूराजस्व संहिता, १९५४, कलम १६२ चे पोट-कलम (३), अन्वये झाडावरील हक्क खरेदी करण्यासाठी अर्ज; १९५५ चा मध्यप्रदेश च

(चच) मध्यप्रदेश भूराजस्व संहिता, १९५४, कलम २१९, अन्वये तयार केलेल्या निस्तार पत्रकातील कोणत्याही नोंदीत फेरफार करण्यासाठी दावा;] १९५५ चा मध्यप्रदेश च

(छ) [५]सन १८६५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला विधी या अन्वये ठरविलेल्या सीमांबाबत, किंवा अशा हद्दींच्या निशाण्यांबाबत अशा कोणत्याही विधी अन्वये सक्षम अधिकाऱ्याने दिलेला कोणताही आदेश रद्द ठरविण्याबाबत दावे :

परंतु,

(ज) कोणत्याही व्यक्तीच्या नावे किंवा व्यक्तींच्या कोणत्याही वर्गाच्या नावे पूर्वी अस्तित्वात नसलेली माफी देण्याची स्पष्ट तरतूद ही, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या ज्या अधिनियमान्वये केली गेली असेल किंवा अशा माफीस तिची सरकारी दफ्तरात नोंद केली आहे म्हणून किंवा अशी माफी ठराविक वर्षाच्या मुदतीसाठी अस्तित्वात होती म्हणून स्पष्टपणे ज्या अधिनियमान्वये मान्यता दिली असेल त्या अधिनियमानुसार; अथवा

---

१ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश, यान्वये मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४ (दोन) याद्वारे मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९५९ चा मुंबई अधि. क्र. ४८, कलम ४, (तीन) द्वारे खंड (चक) ते (चच) समाविष्ट करण्यात आले.

५ जेथे हा अधिनियम नंतर अंमलात आला त्या क्षेत्रामध्ये, मुंबई भूमि महसूल संहिता १८७९,(१८७९ चा मुंबई ५) द्वारे (१८६८ चा मुंबई ४, सन १८६५ चा मुंबई १) कलमे ३७ व ३८ खेरीज) आणि सन १८२७ चा मुंबई नोंदणी १७ निरसित करण्यात आले. अधिनियम, १८८० (१८८० चा मुंबई १) जेथे लागू आहे किंवा होता अशा रत्नागिरी किंवा कोलाबा जिल्ह्यातील कोणत्याही गावांना सन १८६५ चा मुंबई अधि. क्र. १ याची कलमे ३७ आणि ३८ जशी लागू होती, ती निरसित केली आहेत.

(झ) सन १८६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम १, खंड एक किंवा सन १८६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २, खंड १, अन्वये [1][[2][राज्य]सरकाने] किंवा त्याच्या आदेशान्वये दिलेला लेख किंवा सनद या अनुसार; अथवा

[3][(झझ) जे प्रदेश, राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६, याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी सौराष्ट्र, हैद्राबाद, मध्यप्रदेश किंवा कच्छ राज्यात होते आणि आता महाराष्ट्र राज्याचे भाग झाले आहेत अशा प्रदेशांच्या कोणत्याही सरकारने योग्य रीतीने दिलेला किंवा केलेला कोणताही लेख, सनद किंवा इतर लेखी अधिकारपत्र; किंवा] १९५६ चा ३७.

(ञ) ज्या अनुदानान्वये अशी माफी स्पष्टपणे देण्यात किंवा मान्य करण्यात आली ते ब्रिटिश सरकारने दिलेले लेखी अनुदान या अनुसार ; किंवा

(ट) न्यायालयाच्या निर्णयानुसार किंवा सन १८७२ चा[4] मुंबई विनियम क्रमांक १७, यातील प्रकरण दहा अन्वये सक्षम अधिकाऱ्याने योग्यरीत्या दिलेल्या निवाड्यानुसार किंवा विवक्षित वादग्रस्त मालमत्ता यास माफी असल्याचे ज्या अधिनियमान्वये ठरविण्यात आले आहे तो सन १८५२ चा[5] अधिनियम क्रमांक ११ अन्वये [6][किंवा तत्कालीन अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधि अन्वये ;]

जमीन महसुलाची संपूर्णतः किंवा अंशतः माफी मिळण्यासंबंधी कोणत्याही व्यक्तीकडून दावा केला असता त्याची दिवाणी न्यायालयांना दखल घेता येईलः

(ज) ची उदाहरणे.

(१) या अधिनियमात असे ठरविण्यात येत आहे की, जमिनीच्या मालकी हक्काबाबत, सरकारची व्यक्तीकडे हस्तांतरित झालेली मालमत्ता, असे हस्तांतर करते वेळी जी आकारणी करण्यात आली होती त्या आकारणीप्रमाणे त्यांना नेहमीकरता धारण करण्याची परवानगी दिली जाईल. विवक्षित जमिनीतील मालकी हक्क हा शंभर रुपयाच्या आकारणीने 'अ' कडे हस्तांतरित करण्यात आला. 'अ' या व्यक्तीच्या नावे पूर्वी अस्तित्वात नसलेली अशा ज्यादा-आकारणीची माफी 'अ' च्या नावे देण्यात आली. तेव्हा 'अ' ला जादा आकारणी विरुद्ध दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे.

(२) या अधिनियमात असे ठरविण्यात येत आहे की, जेव्हा आकारणीची विशिष्ट मर्यादा ठरविण्यात येऊन त्याबाबत अंमलबजावणी करण्यात येईल तेव्हा, आकारणी अशा विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक असता कामा नये. ज्या जमिनीची आकारणी शंभर रुपयाइतकी आहे अशा जमिनीचा 'अ' हा मालक आहे. तो आणि त्याचे पूर्वाधिकारी यांच्यामध्ये झालेल्या व्यवहारानुसार त्याच्या जमिनीच्या आकारणीचा दर जास्त नव्हता ह्या मुद्यावर त्याच्या जमिनीच्या आकारणीचा दर फक्त ५० रुपये असावा असा त्याने

---

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मुळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४ (चार) द्वारे खंड (झझ) समाविष्ट करण्यात आला.

[4] नंतर ज्या क्षेत्रांमध्ये अधिनियम अंमलात आला त्यात १८७९ ची मुंबई जमीन महसूल संहिता (१८७९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५) द्वारे १८६८ चा मुंबई अधिनियम क्र. ४, १८६५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ (कलम ३७ व ३८ याव्यतिरिक्त) व १८२७ चा मुंबई विनियम १७ हे निरसित करण्यात आले. ज्या रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यातील कोणत्याही गावांमध्ये जोपर्यंत खोती जमाबंदी अधिनियम, १८८० (सन १८८० चा मुंबई अधिनियम क्रमांक १) अंमलात होता किंवा करण्यात आला होता तोपर्यंत त्यांना लागू असलेली सन १८६५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ ची कलमे ३७ व ३८ निरसित होती.

[5] मुंबई करमुक्त संपत्ती अधिनियम, १८५०.

[6] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४ (चार) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

दावा केला. पूर्वी अस्तित्वात नसलेली अशी कोणतीच सूट या अधिनियमाअन्वये करण्यात आली नाही. आणि म्हणून 'अ' ने केलेल्या दाव्याची दिवाणी न्यायालयास दखल घेता येणार नाही.

५६ चा (३) या अधिनियमात असे ठरविण्यात येत आहे की, जमीन-नोंदणी पुस्तकात जमीन महसूलाची माफी असल्याबद्दल नोंद केलेल्या आणि धारण केलेल्या अशा कोणत्याही जमिनीवर जमीन महसूल आकारता येणार नाही. 'अ' ही व्यक्ती ती जमीन, जमीन महसुलाची माफी म्हणून धारण करीत आहे आणि नोंदणी पुस्तकात तसा उल्लेख केला आहे, या मुद्यावर त्याने अशी जमीन माफीने धारण करण्याबद्दल दावा केला. अशा प्रकारची माफी ही सरकारी दफ्तरात नोंदलेली आहे म्हणून तिला माफी असल्याबद्दल अधिनियमान्वये स्पष्टपणे मान्यता दिली आहे आणि म्हणून 'अ' ने केलेल्या दाव्याची दिवाणी न्यायालयास दखल घेता येणार नाही.

(४) या अधिनियमात अशी तरतूद करण्यात येत आहे की, कलेक्टराने, विवक्षित नकाशांमध्ये दर्शविलेल्या सर्व जमिनीची अस्तित्वात असलेली माफी कायम करावी. 'अ' ह्या व्यक्तीने तिची जमीन अशा नकाशात दर्शविली आहे या मुद्यावर माफी मिळण्यासाठी दावा केला. 'अ' ने केलेल्या दाव्याची दिवाणी न्यायालयास दखल घेता येईल.

(५) या अधिनियमात अशी तरतूद करण्यात येत आहे की, आकारणी ही, इतर गोष्टी विचारात न घेता विवक्षित मुद्यांवरच ठरविण्यात आली पाहिजे. या तरतुदीनुसार कोणत्याही व्यक्तीच्या किंवा वर्गाच्या नावे माफी दिली गेलेली नाही. आणि म्हणून या तरतुदी अनुसार केलेल्या आकारणी विरुद्ध घेतलेल्या कोणत्याही हरकतीची दिवाणी न्यायालयास दखल घेता येणार नाही.

५. कलम ४ मधील कोणत्याही मजकुरामुळे, दिवाणीं न्यायालयास पुढीलप्रकारचे दावे दाखल करून घेण्यास प्रतिबंध होतो, असे समजता कामा नये. विवक्षित दाव्यांचा बचाव.

(क) राज्य सरकारने याबाबत ठरविलेल्या रकमेहून जमीन महसूल म्हणून मागणी केलेली, नाखुशीने भरलेली किंवा वसूल केलेली रक्कम जास्त आहे म्हणून त्या रकमांबद्दलचे दावे, किंवा अशी रक्कम मागणी करण्याच्या, भरण्याच्या किंवा वसूल करण्याच्या पूर्वीच संपूर्णतः किंवा अंशतः भरली असेल, म्हणून किंवा त्याचा प्रतिनिधी हा अशा रकमेबाबत जबाबदार नाही म्हणून [१][[२][सरकार] विरुद्ध केलेले] दावे ;

(ख) महसूल-पाहणी पत्रकांतील कबुलायतीतील किंवा गांवाच्या दफ्तरातील कोणत्याही नोंदीमुळे ज्यावर परिणाम होऊ शकत असला तरीही असा कोणताही खाजगी हक्क प्रस्थापित करण्यासाठी पक्षकारांनी खाजगीरीत्या केलेले दावे ;

(ग) खातेदार किंवा कुळे यांच्याकडून येणे असलेल्या रकमेची मागणी केल्याबद्दलचे किंवा तिची वसुली केल्याबद्दलचे वरिष्ठधारक किंवा खातेदार आणि कनिष्ठधारक किंवा कुळे यांच्यातील दावे; आणि कलम (४), खंड (छ), मधील कोणत्याही मजकुरामुळे दिवाणी न्यायालयास, एकाच भूमापन क्रमांकाच्या कोणत्याही जमिनीच्या कब्जासाठी किंवा भूमापन क्रमांकातील हिस्सा म्हणून मान्य केलेल्या कोणत्याही जमिनीच्या कब्जासाठी दावा स्वीकारण्यास प्रतिबंध होतो असे समजता कामा नये. यात [१][[२][सरकार] विरुद्ध करण्यात आलेल्या] दाव्यांचा समावेश होत नाही.

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][आणि कलम ४ मधील कोणत्याही मजकुरामुळे, दिवाणी न्यायालयास, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या जिल्ह्यात, २८ मार्च १८७६ या दिवशी अंमलात असलेल्या विधिच्या अटीनुसार :–

(क) सन १८७४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही विधि याअन्वये नेमलेल्या किंवा मान्यता दिलेल्या वंशपरंपरागत अधिकाऱ्याच्या पदाशी किंवा इतर कोणत्याही ग्राम अधिकाऱ्याशी किंवा सेवकाशी संबंध असणाऱ्या कोणत्याही मालमत्तेसंबंधीचे ;

(ख) जमीन महसुलाची अंशतः किंवा पूर्णतः माफी असलेली जमीन धारण करण्यासंबंधीचे ;

(ग) जमीन महसुलावर आकारलेल्या किंवा त्यातून देणे असलेल्या किंवा रकमा स्वीकारण्या-संबंधीचे, [२][[३][सरकार] विरुद्ध केलेले] दावे, याबाबत त्याला जे क्षेत्राधिकार चालविता आले असते असे क्षेत्राधिकार चालविण्यास प्रतिबंध होतो असे समजता कामा नये.]

६. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या तरतुदींनुसार महसूल अधिकाऱ्यांनी सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा त्यांनी तसे करण्याबद्दल आदेश दिलेल्या कोणत्याही कृत्यामुळे नुकसानी झाल्यास, अशा झालेल्या नुकसानीबद्दल कोणत्याही दिवाणी न्यायालयात त्याच्यावर दावा लावता येणार नाही. महसूल अधिकाऱ्या-विरुद्ध विवक्षित दावे करण्यास मनाई.

जर, कोणताही महसूल अधिकारी त्याला त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने बोलाविले असता हजर राहीला नाही किंवा फरारी झाला तर, आणि जिल्हाधिकाऱ्याने त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विधीच्या तरतुदीनुसार त्याच्यावर किंवा सरकारी पैसा, कागदपत्रे किंवा मालमत्ता याजबद्दल त्याचे जामीन म्हणून राहिलेल्या व्यक्तींवर कारवाई केल्यास, असा जिल्हाधिकारी त्याच्याविरुद्ध अशा अधिकाऱ्याने किंवा जामीन म्हणून राहिलेल्या व्यक्तींनी केलेल्या कोणत्याही दाव्यासंबंधी जरी फरारी झालेल्या किंवा गैरहजर राहीलेल्या अशा अधिकाऱ्याकडून मागणी केलेल्या रकमेचा काहीही हिस्सा येणे नाही किंवा अशा रकमेचा काही हिस्साच येणे आहे किंवा त्याच्याकडे मागणी केलेले कागदपत्रे किंवा मालमत्ता त्याच्याकडे नव्हतीच असे जरी आढळून आले तरीही, तो नुकसानी किंवा खर्च देण्यास जबाबदार असणार नाही.

महसूल अधिकाऱ्याला दिलेल्या शिक्षेमुळे किंवा त्याच्याविरुद्ध केलेल्या खटल्यामुळे दिवाणी उपाययोजना करण्यात प्रतिबंध न होणे.

७. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीतील ज्या तरतुदींनुसार कोणत्याही महसूल अधिकाऱ्याविरुद्ध त्याने कोणताही अपराध केल्याबद्दल किंवा कर्तव्य बजावण्यात कसूर केल्याबद्दल विभागांतर्गत चौकशी केल्यावर शिक्षा देण्याचा अधिकार आहे किंवा ज्या तरतुदींनुसार अशा अपराधाबद्दल किंवा कसुरीबद्दल त्याच्याविरुद्ध फौजदारी खटला करता येईल त्या तरतुदींमुळे, अशा अधिकाऱ्याविरुद्ध दिवाणी न्यायालयात जी कोणतीही उपाययोजना करण्याचा अधिकार आहे ती उपाययोजना करण्यास प्रतिबंध होतो असे समजता कामा नये.

---

[१] (सन १८७७ चा १६) मुंबई महसूल क्षेत्राधिकार (सुधारणा) अधि. १८७७ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८ ते १०. [महसूल अधिकाऱ्यांविरुद्ध दावे; त्यांच्या कामकाजाविरुद्ध अपिले; स्थानिक सरकारचा कागदपत्र मागविण्याचा अधिकार.] ही कलमे सन १८८० चा अधिनियम १५ अन्वये रद्द करण्यात आली.

अपील करण्याचा अधिकार वादीने बजाविल्याशिवाय दावे दाखल करता कामा नये.

११. कोणत्याही महसूल अधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही कृत्याबाबत किंवा वर्तनाबाबत [१][[२][सरकार] विरुद्ध] केलेल्या कोणत्याही दाव्याची दखल, जोवर वादी प्रथमतः असे सिद्ध करून दाखवीत नाही की त्याने असा दावा दाखल करण्यापूर्वी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विधिअन्वये संमत असलेली आणि असा दावा दाखल करण्यास दिलेल्या मुदतीच्या आत शक्य होती तितकी अपिले दाखल केली होती तोपर्यंत, [३][महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मध्ये अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय कोणत्याही दिवाणी न्यायालयाने] घेता कामा नये. १९६६ चा ४१.

वादग्रस्त मुद्दे निर्णयासाठी उच्च न्यायालयाकडे पाठविण्याचा [६][राज्य] सरकारचा अधिकार.

१२. हा अधिनियम संमत झाला नसता तर, दिवाणी न्यायालयाने ज्या दाव्याची, मागणीची किंवा हरकतीची न्यायचौकशी किंवा चौकशी केली असती अशा कोणत्याही दाव्याच्या, मागणीच्या किंवा हरकतीच्या न्यायचौकशीसंबंधी किंवा चौकशीसंबंधी उत्पन्न झालेल्या ज्या कोणत्याही प्रश्नाबाबत उच्च-न्यायालयाचा निर्णय घेण्याची [४][***] [५][[६][राज्य] सरकारची] इच्छा असेल असा प्रश्न उद्भवल्यास [४][***] [७][***] [५][[६][राज्य] सरकारास] अशा प्रश्नासंबंधीचे विवरणपत्र तयार करविण्याचा आणि असा मुद्दा [८][***] उच्च न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविण्याचा अधिकार आहे.

उक्त उच्च न्यायालयाने त्याजकडे सोपविण्यात आलेल्या अशा मुद्याच्या सुनावणीसाठी एखादा दिवस लवकर ठरविला पाहिजे आणि अशा दिवसा संबंधीची अधिसूचना न्यायालयाच्या आवारात लावण्याची व्यवस्था केली पाहिजे.

अशा प्रकरणातील पक्षकारांना सुनावणीसाठी स्वतः जातीने किंवा आपल्या अधिवक्त्यांर्फत किंवा वकीलांमार्फत उच्च न्यायालयात हजर राहण्याचा अधिकार आहे.

उच्च न्यायालयाने, अशा प्रकरणाची सुनावणी केल्यावर आणि त्यावर विचार केल्यानंतर, आपल्या निर्णयाची प्रत त्यासंबंधीच्या कारणांसह आणि त्यावर न्यायालयाचा शिक्का लावून ज्या सरकारने ती बाब निर्णयासाठी पाठविली होती त्याच्याकडे पाठविली पाहिजे, आणि [९][सर्वोच्च न्यायालयाकडे] करावयाच्या कोणत्याही अपिलास अधीन राहून, अशा निर्णयानुसार निकालात काढली पाहिजे.

अशा कोणत्याही विवरणपत्राची रचना सदोष आहे असे उच्च न्यायालयास वाटल्यास, त्यास ते सुधारण्यासाठी परत पाठवू शकेल.

असे कोणतेही प्रकरण पाठविण्यात आल्यामुळे त्यासंबंधीच्या खर्चाचा निर्णय उच्च न्यायालय प्रत्येक प्रकरणात निदेश देईल त्याप्रमाणे केला पाहिजे.

---

[१] विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३३४ (अनुसूची के) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[८] विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ याद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[९] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

१३. दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या कोणत्याही दाव्याबाबत किंवा सादर केलेल्या कोणत्याही अपिलाबाबत, अशा दाव्याची किंवा अपिलाची दखल घेण्यास या अधिनियमाअन्वये आपणास प्रतिबंध होतो अशी न्यायाधिशास शंका वाटल्यास त्यास अशी बाब उच्च न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविण्याचा अधिकार आहे.

क्षेत्राधिकारा-संबंधीचे मुद्दे उच्च न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविण्याचा दिवाणी न्यायाधिशाचा अधिकार.

ज्याने असे प्रकरण निर्णयासाठी पाठविले असेल त्या न्यायाधिशास, काम पुढे चालू करण्याचा किंवा वादपत्र परत करण्याचा आदेश देण्याचा उच्च न्यायालयास अधिकार आहे.

अशा कोणत्याही निर्णयासंबंधीचा उच्च न्यायालयाचा आदेश, हा [१][सर्वोच्च न्यायालयाकडे] करावयाच्या अपिलास अधीन राहून आणि पूर्वोक्तप्रमाणे असेल ते खेरीजकरून, अखेरचा असेल.

१४. कलम १२ किंवा कलम १३ अन्वये केलेल्या प्रत्येक बाबीची सुनावणी, मुख्य न्यायाधीश वेळोवेळी निर्दिष्ट करील इतक्या परंतु तीन पेक्षा कमी नसतील इतक्या न्यायाधीशांच्या न्यायमंडळाने केली पाहिजे.

न्याय, मंडळातील न्यायाधिशांची संख्या

१५. [सन१८६९ चा अधिनियम १४, कलम ३२ ची सुधारणा.] हे कलम सन १९३८ चा अधिनियम १ या अन्वये रद्द करण्यात आलें.

[२][१६. पहिल्या वर्गाच्या अधीन न्यायाधिशाच्या न्यायालयात [३][सरकार [४][विरुद्ध] ] [५][***] किंवा कोणत्याही महसूल अधिकाऱ्याविरुद्ध दावा दाखल करण्यात आला असेल [६][आणि [३][सरकार] ] [५][***] दाव्याचा बचाव करणे हाती घेईल तर, अशा कोणत्याही दाव्यास, अशा पहिल्या वर्गाच्या अधीन न्यायाधिशाच्या न्यायालयात अनिर्णित असलेल्या सर्व दिवाणी कामकाजापेक्षा किंवा दाव्यापेक्षा प्राधान्य देण्यात यावे अशी [७][राज्य] सरकारने, आपल्या सचिवाची ज्यावर सही आहे अशी प्रमाणपत्राद्वारे मागणी करणे हे [८][सरकारला] विधिसंमत असेल किंवा असा दावा जिल्हा न्यायाधिशाच्या न्यायालयाकडे वर्ग केला गेल्यास अशा सर्व आज्ञा न्यायालयाने अंमलात आणल्या पाहिजेत.

[३][सरकारने] [५][***] बचाव केलेल्या दाव्यांबाबत त्याचे विशेष अधिकार.

या कलमांअन्वये [९][राज्य सरकारास] प्रदान केलेले सर्व विशेष हक्क, योग्य त्या फेरफारांसह, या कलमात उल्लेख केलेल्या अशा कोणत्याही दाव्यातील कोणत्याही हुकूमनाम्यावर केलेल्या कोणत्याही विशेष किंवा सामान्य अपिलास लागू असतील.]

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१, कलम २ द्वारे मूळ कलमाऐवजी कलम १६ दाखल करण्यात आले.
[३] विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[५] भारतीय स्वराज्य (केंद्रीय विधि व अध्यादेश अनुकूलन) आदेश, १९४८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
[६] भारतीय अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[७] वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[८] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[९] विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१७. [खंड एक. सन १८२७ चा मुंबई विनियम १७, कलम १३, पुन्हा अंमलात आणणे] हे कलम सन १८८० चा अधिनियम १५ अन्वये रद्द करण्यात आले. परंतु, रद्द करण्यात आलेले कलम हे, जोवर व जोपर्यंत मुंबई जमीन महसूल अधिनियम (सन १८७९ चा मुंबई अधिनियम ५) ... कोणत्याही अनुसूचीतील जिल्ह्यास लागू करण्यात येत नाही तोवर व तोपर्यंत त्या जिल्ह्यात अंमलात येणार नाही.

[खंड दोन. गावाच्या आणि नगराच्या जागात सन १८२७ चा मुंबई विनियम १७ याचा अंमल.] हे कलम सन १८८० चा अधिनियम १५ अन्वये रद्द करण्यात आले.

[खंड तीन. सरकारने दिलेल्या विवक्षित रकमांची वसुली.] हे कलम सन १८८० चा अधिनियम ५ अन्वये रद्द करण्यात आले.

## अनुसूची

### [(अधिनियमिती) निरसन ]

१८९१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ द्वारे निरसित.

### [1][दुसरी अनुसूची

अहमदाबाद जिल्हा

पंच महाल वगळून कैरा जिल्हा

ब्रोच जिल्हा

१८४८ चा मुंबई [2]अधिनियम क्रमांक दहा सोबत जोडलेल्या अनुसूचीत वर्णन केल्यानुसार व्यपगत मांडवी राज्य वगळून सुरत जिल्हा.

ठाणे जिल्हा

१८५३ चा मुंबई [2]अधिनियम क्रमांक आठ मध्ये नमूद केल्यानुसार व्यपगत कुलाबा राज्य वगळून कुलाबा जिल्हा.

रत्नागिरी जिल्हा.

कनारा जिल्हा]

---

[1] मुंबई महसूल अधिकारिता (सुधारणा) अधिनियम, १८७७ (१८७७ चा १६) कलम ५ द्वारे ही अनुसूची समाविष्ट करण्यात आली.

[2] निरसन व सुधारणा अधिनियम, १८९१ (१८९१ चा १२) द्वारे १८४८ चा अधिनियम क्रमांक १० व १८५३ चा अधिनियम क्रमांक ८ निरसित करण्यात आले.

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे